# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धीपत्रक

## ❖ सफाई मित्रांच्या सुरक्षेसाठी 'NAMASTE' योजनेअंतर्गत पीपीई किट्सचे वाटप

केंद्रिय सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालय आणि गृहनिर्माण व नगरविकास मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने 'NAMASTE' (National Action for Mechanised Sanitation Ecosystem) ही योजना सफाई कामगारांच्या सुरक्षितता, सन्मान आणि समावेशासाठी केंद्र शासनाने २०२२ मध्ये सुरु केली आहे. या योजनेची अंमलबजावणी राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ (NSKFDC) यांच्या माध्यमातून होत आहे.

❖ NAMASTE योजनेचे प्रमुख उद्दिष्टे:

· गटार व सांडपाणी साफसफाईचे धोकादायक मॅन्युअल (हाताने करणारे) काम पूर्णतः समाप्त करणे.

· यांत्रिक साफ-सफाई उपकरणांच्या वापराला प्रोत्साहन देणे.

· सफाई कामगारांना सुरक्षाकवच, आरोग्य सेवा, कौशल्यविकास आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करणे.

योजनेचा दुसरा टप्पा गटार/सेप्टिक टँक साफ करणारे मजूर (SSWs) यांच्यासाठी होता. या अंतर्गत, मिरा भाईंदर महानगरपालिकेने (MBMC) कार्यरत SSWs यांचे वैयक्तिक, आरोग्यविषयक आणि रोजगाराशी संबंधित माहिती संकलित करून राष्ट्रीय MIS प्रणालीमध्ये नोंदवली आहे. योजनेच्या पुढील टप्प्यात मिरा भाईंदर मनपाला NSKFDC कडून ११६ पीपीई किट्स प्राप्त झाले असून, सदर किट्स आता सफाईमित्रांना वाटपाचा कार्यक्रम मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात दि.१३/८/ २०२५ रोजी आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ.शर्मा (भा.प्र.से), अतिरिक्त आयुक्त श्रीम. प्रियांका राजपूत व शहर अभियंता दिपक खांबीत यांच्या उपस्थितीत पार पडला. या किट्समुळे कामाच्या ठिकाणी सुरक्षितेत वाढ होणार असून, ही पावले सफाईमित्रांच्या आरोग्याचा आणि हक्कांचा सन्मान करणारी आहेत.

❖ मिरा भाईंदर महानगरपालिकेने राबविलेले अन्य महत्त्वाचे उपक्रम

१) साफसफाई कामगारांसाठी नित्य आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.

२) सुरक्षित कामकाजाविषयी जागृती सत्रे घेतली आहे.

3) काम करीत असताना घ्यावयाची दक्षता याविषयी मार्गदर्शन शिबिर घेतले जातात.

यांत्रिक साफसफाईचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिल्यामुळे टप्प्याटप्प्याने हाताळणी (manual intervention) कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच सफाई कर्मचारी यांचे आरोग्य संवर्धन होऊन नक्कीच त्यांच्या कार्यात गतिमानता येईल. सफाई कर्मचाऱ्यांनी काम करीत असताना ही पीपीई कीटचा वापर नक्की करावा जेणे

करून तुमच्या आरोग्यालाला धोका होणार नाही. नियमानुसार सफाई करताना पीपीई किटचा वापर करण अत्यंत आवश्यक आहे जर सांगून सुद्धा दिलेले पीपीई किट सफाई कर्मचाऱ्यांनी वापरले नाही तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. त्यासोबत त्यांच्या ठेकेदारावर देखील कारवाई करण्यात येईल असे मा. आयुक्तांनी स्पष्ट शब्दात सांगितले आहे. सदर पीपीई कीट वाटप कार्यक्रमाला मनपा अधिकारी, कर्मचारी व सफाई मित्र मोठया संख्येने उपस्थित होते.

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका